# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक ३३४-२२** **दिनांक ०८/११/२०२२**

## Mega Legal Literacy Camp (महाशिबिर) मध्ये
## सायबर गुन्हे स्टॉलला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील वसई पोलीस ठाणेचे हद्दीत न्यु इंग्लिश स्कुल, वसई येथे मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशानुसार तालुका विधी सेवा समिती, वसई ( जिल्हा व अति.सत्र न्यायालय, वसई) यांच्या मार्गदर्शनानुसार **Mega Legal Literacy Camp** (महाशिबिर) दिनांक ०६/११/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वाजता ते दुपारी १६.०० वाजेपावेतो आयोजित करण्यात आले होते.

सदर ठिकाणी नमूद कार्यक्रमाकरिता येणारे मान्यवरांकरीता तसेच नागरिकांच्या माहिती/जनजागृती करीता पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे आदेश व मार्गदर्शनानुसार सायबर गुन्हे कक्षाकडून दैनंदिन घडणारे गुन्हे संदर्भात जनजागृतीसाठी स्टॉल लावण्यात आला होता. सदर स्टॉलमध्ये विविध प्रकारचे जनजागृती फलके तसेच नागरिकांकरिता माहिती पत्रके ठेवण्यात आलेले होते. सदर स्टॉलला अंदाजे २३० नागरिकांनी भेट देवून सायबर गुन्हयांसदर्भात होणाऱ्या गुन्हयांची माहिती घेतली आहे. तसेच सायबर गुन्हे कक्षाकडून ठेवण्यात आलेल्या सेल्फी स्टँड सोबत सेल्फी काढून नागरिकांनी सदर उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

सदर उपक्रमात श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोहवा/१२१०७ माधूरी धिंडे, पोअं/१२०९२ प्रविण आव्हाड, पोअं/१२०९५ गणेश इलम, मपोअं/१६१०६ अमिना पठाण, म.सु.ब/प्रशांत श्रिरामे,महीला मसुब अपर्णा गायकवाड, मसुब सोनाली मोरे यांनी सहभाग नोंदविला आहे.


मिरा-भाईंदर, वसई-विरार
पोलीस आयुक्तालय अंतर्गत
सायबर सेल
CYBER CRIME CELL MBVV




महाराष्ट्र पोलीस
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
सायबर गुन्हे कक्ष
सॅन्थोम पब्लिक स्कूल जवळ, ओसवाल हाईट्स समोर, कनाकिया रोड, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे-401107, 022-2811 0135 । व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. 900 488 0135
Email - cybercrime.mbvv@mahapolice.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
प्रचलित सायबर गुन्ह्यांचा प्रकार
विजबिल थकित : सेवा खंडित करण्याचे एमएमएस पाठवून फसवणूक
लोन अॅप डाउनलोड केल्यानंतर बदनामिची धमकी देवून पैसे उकळतात
क्रिप्टो करन्सी गुंतवणूक फसवणूक
व्हाटसअॅपद्वारे संदेश
• ऑनलाईन लॉटरी लागल्याने सांगून फसवणूक
• गिफ्ट व्हाऊचर लागल्याचे सांगून फसवणूक
• ऑनलाईन खरेदी वेबसाईट लिंकद्वारे फसवणूक
सोशल मिडीया द्वारे होणारी फसवणूक
• मुलगा / मुलगी आसल्याचे भासवून चॅटींग
• आक्षेपार्ह व्हिडियो तयार करुन प्रसारीत करण्याची धमकी देवून फसवणूक
• अधिक नफा मिळविण्याचे आमिश दाखवून फसवणूक
ओएलएक्स फ्रॉड :वस्तु खरेदीचे आमिश दाखवून फसवणूक
सिम / क्रेडिट कार्ड केवायसी करण्याचे सांगून फसवणूक
गुगल शोध फसवणूक
Trending Cyber Frauds
Electricity Fraud
Loan App Fraud
Crypto Currency Fraud
Whats App Messages Fraud
• Online Lottery
• Gift Voucher Fraud
• Bogus Link Shopping Fraud
Social Media Fraud
• Fake Profile -
• Sextortion
• Investment Fraud
Olx Fraud
SIM, Bank KYC Update
Google Search Fraud
सायबर फसवणूक झाल्यास काय करायचं ?